ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 11 | JULY - 2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ऐतिहासिक संगमनेर



**श्री. राजेंद्र विठ्ठल पानसरे**
**(संशोधक विद्यार्थी)**
**डॉ. मच्छिंद्र कारभारी फसले**
**(प्राचार्य, आबासाहेब काकडे आर्ट्स कॉलेज बोधेगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर)**

## प्रस्तावना

अहमदनगर जिल्हातील संगमनेर हा एक तालुका आहे. प्रवरा, म्हाळुंगी, म्हानुटी व नाटकी या चार लहान-मोठ्या नद्यांच्या संगमावर वसलेले 'संगमनेर' हे शहर या तालुक्याचे मुख्यालय आहे प्राचीन काळापासून तालुक्याच्या भूभागाला ऐतिहासिक परंपरा लाभलेली दिसून येते. ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली अनेक स्थाने तालुक्यात आहेत. संगमनेर शहराचे प्राचीनत्व साधारण इ.स. २०० च्या दरम्यानचे असावे असे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासकांचे मत आहे या अभ्यासकांच्या मते मानवी वस्तीसाठी हे ठिकाण अनुकूल असल्याने येथे या दरम्यान एक छोटेसे खेडे निर्माण झाले असावे. नद्यांच्या संगमावर असल्याने पुढे या गावाला 'संगमिका' या नावाने ओळखले जाऊ लागले. चालुक्य व यादव काळात संगमिका या गावाचा उल्लेख 'संगमनगर' असा केला जात होता. बहामनी व अहमदनगरच्या निजामशाहीच्या काळात संगमनगर हे गाव 'संगमनेर' या नावाने ओळखले जाऊ लागले. या संगमनेर व तालुक्याचा भूभाग हा इसवी सन पूर्व काळापासून सन १९०० पर्यंत सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, बहामनी, निजामशाही, मोगल, मराठे व ब्रिटीश या राजवटींच्या वर्चस्वाखाली असलेला दिसून येतो.

## ताम्रपाषणयुगीन जोर्वे संस्कृती

अश्मयुग ते लोहयुग या दरम्यानच्या हजारो वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या भूभागावर मानवी वस्तीचे अस्तित्व असल्याचा कोणताही पुरावा सन १९५० पर्यंत उपलब्ध झालेला नव्हता. त्यामुळे अश्मयुग ते लोहयुग या काळात महाराष्ट्राच्या भूभागावर कोणत्या घडामोडी झाल्या याची कोणतीही माहिती ज्ञात नव्हती. या कालखंडावर प्रकाश टाकणारा पुरातत्वीय पुरावा सन१९५०-५१ च्या सुमारास संगमनेर तालुक्यातील प्रवरा नदीच्या काठावर वसलेल्या जोर्वे या गावी झालेल्या उत्खननातून उपलब्ध झाला आणि त्यामुळेपाषाणयुग ते लोहयुग यामधील एका महत्वपूर्ण दुव्याचा शोध इतिहास मांडणीच्या संदर्भात महत्वाचा ठरला.

सन १९४७ मध्ये प्रवरा नदीला आलेल्या पुरामुळे जोर्वे या गावातील घरांची वाताहत झाली होती. त्यामुळे गावकऱ्यांनी तेथूनच जवळ असलेल्या थोड्याश्या उंच भागावर (पांढरी) वस्ती करण्यास सुरवात केली. घरे किंवा इतर कामांसाठी खणताना येथील जमिनीच्या वरच्या थरात तांबड्या व काळ्या रंगात चित्रकारी केलेली तोटीची भांडी व वाडगे तसेच काही मडकी व तांब्याच्या सपाट चौकोनी कुऱ्हाडी स्थानिक लोकांना सापडल्या. जोर्वे म्हणजे 'जरासंध राजाची नगरी' अशी आख्यायिका लोकांमध्ये प्रचलित असल्याने ही मडकी महाभारतकालीन लोकांची असावीत अशी भावना स्थानिक लोकांमध्ये होती परंतु अशा स्वरुपाच्या आकाराची मडकी तोपर्यंत महाराष्ट्रात कोठेही सापडली नसल्याने ती अद्वितीय होती. मातीची भांडी व मडकी यांच्या बरोबरच गारगोटीच्या छिलक्यापासून बनवलेली अनेक प्रकारची पाती, तासण्या, बाणाग्रे व टोचे या वस्तू वरवर आढळून आल्याने येथे सन १९५०-५१ च्या सुमारात छोटेसे उत्खनन डेक्कन कॉलेजतर्फे प्रख्यात पुरातत्वज्ञ हंसमुख धीरजलाल सांकलिया आणि डॉ शांताराम भालचंद देव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले

जोर्वे येथील उत्खननात सापडलेल्या मडक्यांना 'जोर्वे मडकी' असे नाव देण्यात आले. ही मडकी खणखणीत आवाजाची, उत्तम भाजणीची, लाल रंगाची आणि चाकावर घडवलेली होती. या मडक्यांवर काळ्या रंगात रेषा, पट्टे, जाळी, जाळीचे त्रिकोण आणि चौकोन असे भौमितीक प्रकारचे चित्रकाम केलेले आहे. फनेलसारखे तोंड व तोटी असलेली मडकी, त्याचप्रमाणे अंतर्वक्र बाजू असलेले वाडगे हे येथे सापडलेल्या मडक्यांचे प्रमुख आकार असून याशिवाय कप, तसराळे व झाकण्या हेही आकार प्रचलित होते. तोटीयुक्त वाडगे त्याचप्रमाणे एकावर एक जोडलेली उतरंडीसारखी मडकी हेही वैशिष्ट्यपूर्ण आकार जोर्व्याच्या उत्खननामध्ये सापडले आहेत. काही मडक्यांच्यावर उत्कीर्ण रेषा त्याचप्रमाणे काळ्या रेषात काढलेली चिन्हे दिसून आली आहेत. या शिवाय विविध रंगीत दगडाचे मणी, तांब्याच्या चपट्या, काटकोन चौकोनी कुऱ्हाडी व बांगड्या त्याचप्रमाणे गारगोटीच्या छिलक्यापासून बनवलेली विविध हत्यारे वैगरे या वस्तु उत्खननात सापडल्या आहेत. वास्तविक जोर्वे येथे झालेले उत्खनन फार मोठे व खोलवर नव्हते. पण त्यातून मिळालेल्या पुरातत्वीय वस्तूंचा शास्त्रशुद्ध अभ्यास केल्यावर भारतात नद्यांच्याकाठी ताम्रपाषण युगीन शेतकरी अत्यंत प्राथमिक अवस्थेतील शेती करून थोडा स्थिरस्थावर झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

## प्राचीन संगमनेर

गोदावरी ही महाराष्ट्रातील प्रमुख नदी आहे. या नदीच्या वर्धा, वैनगंगा या नद्यांप्रमाणे प्रवरा ही एक प्रमुख उपनदी आहे गोदावरी व प्रवरा खोरे पाषाण काळापासून ते ऐतिहासिक काळापर्यंत मानवी वस्त्यांसाठी अनुकूल राहिले आहे पाषाणयुगीन मानवाची दगडी हत्यारे, नामशेष झालेल्या प्राण्यांचे अश्मीभूत अवशेष आणि ताम्रपाषाणयुगीन काळातल्या असंख्य वस्त्या याची साक्ष देतात ऐतिहासिक काळामध्ये सातवाहन काळापासून ते यादव काळापर्यंत या खोऱ्यात अनेक ऐतिहासिक घडामोडी घडून आलेल्या दिसून येतात गोदावरी व प्रवरा खोऱ्यावर मौर्य साम्राज्यापुर्वी नंद घराण्याचा अंमल असावा नंद घराण्यानंतर गोदावरी व प्रवरा खोऱ्याबरोबरच संपूर्ण महाराष्ट्र हा मौर्य साम्राज्याचा एक भाग होता, हे सम्राट अशोकाच्या महाराष्ट्राच्या भूप्रदेशात उपलब्ध झालेल्या विविध शिलालेलावरून दिसून येते अशोकाच्या शिलालेखांमधून महाराष्ट्रावर राष्ट्रीक, भोजक, पेतेनिक इत्यादी सरंजामदारांची सत्ता असल्याचे दिसून येते

मौर्य काळानंतर गोदावरी व प्रवरा खोऱ्याच्या दरम्यानचा प्रदेश म्हणजेच संगमनेरचा प्रदेश हा सातवाहनांच्या अंमलाखाली होता नाशिक व नाणेघाट येथील सातवाहनांचे शिलालेख आणि नाशिक, नेवासा, कोंडापूर व संगमनेर येथे सापडलेल्या त्यांच्या नाण्यावरूनहा निष्कर्ष काढता येतो. सातवाहन काळातच इ.स. सुमारे २०० च्या दरम्यान प्रवरा, म्हाळुंगी, म्हानुटी व नाटकी या चार नद्यांच्या संगमांवर 'संगमिका' नावाने एक छोटेसे गाव आकाराला आले व पुढील काळात हळूहळूत्याचा विस्तार वाढत गेला. सातवाहन काळात संगमनेर भागातून पैठण-जुन्नर, पैठण-नासिक, नाशिक-पुणे व नेवासा-रतनगड इ. दळणवळणाचे प्रमुख मार्ग जात होते आणि संगमिका म्हणजेच संगमनेर हे ठिकाण या महामार्गावरील महत्वाचा थांबा होते सातवाहानाचे समकालीन असलेला पश्चिमी क्षत्रप राजा नहपान यांच्या एका अमात्याचा एक कोरीव लेख जुन्नर जवळील नाणेघाटाच्या लेखात मिळाला आहे शक क्षत्रप नहपान याने पडलेली नाणी नाशिकच्या प्रदेशात सापडलेली आहे. यावरून इसवी सनाच्या पहिल्या शतकात शकांचा अंमल काही काळ नाशिक, सिन्नर, संगमनेर व जुन्नर परिसरातील भूभागावर होता असे दिसते पण थोड्याच काळात सातवाहनांनी हा प्रदेश जिंकून स्वतःकडे घेतला.

सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांच्यानंतर इस.४०० ते इ.स. ५५० पर्यंत गोदावरी, प्रवरा व मुळा नदीच्या खोऱ्यात म्हणजेच नाशिक - संगमनेर परिसरावर पूर्व राष्ट्रकुट घराण्याचे राज्य असावे कारण या पूर्व राष्ट्रकुट घराण्यातील काही राजांची नाणी नाशिक जिल्ह्यातील बागलाण या ठिकाणी मिळाली आहेत. पुढे इस.५५० ते ६७० पर्यंतच्या काळात या भागावर बदामीचे चालुक्य घराण्याचा अंमल होता. चालुक्यांचे महाराष्ट्रात जे प्रमुख प्रशासकीय विभाग होते त्यामध्ये संगमनेरचा समावेश होता. चालुक्य साम्राज्यामध्ये महाराष्ट्रातील पुनक (पुणे), नासिक, संगमनगर (संगमनेर) व वटनगर इ. चार प्रमुख विषय होते चालुक्य काळात संगमनगर म्हणजेच संगमनेर हे एक प्रशासकीय ठाणे म्हणून विकसित होण्यास सुरवात झालेली दिसून येते.

बदामीच्या चालुक्यानंतर महाराष्ट्रात राष्ट्रकुटांची सत्ता प्रस्तापित झाली राष्ट्रकुट राज्याचा आधार सातवाहनाप्रमाणे गोदावरीचे खोरे हाच होता. राष्ट्रकुट सम्राट द्वितीय गोविंदच्या धुळे ताम्रपटात व राष्ट्रकुट सम्राट चतुर्थ गोविंद यांच्या खंबायत ताम्रपटात गोदावरी नदीचा उल्लेख आला आहे. राष्ट्रकुट सम्राट तृतीय गोविंदच्या पैठण ताम्रपटात अहमदनगर जिल्ह्यातील राशीन, मिरजगाव, वडगाव, बाभूळगाव व राष्ट्रकुट सम्राट चतुर्थ गोविंद यांच्या सांगली ताम्रपटात प्रवरा नदीकाठी असलेल्या नेवासे व श्रीरामपूर या गावांचा उल्लेख आलेला आहे. यावरून प्रवरा खोऱ्यावर व संगमनेर भागात राष्ट्रकुट घराण्याचा अंमल असावा असे दिसते

राष्ट्रकुटांनंतर महाराष्ट्राच्या बहुतांश भूभागावर पश्चिमी चालुक्यांनी(कल्याणीचे चालुक्य) आपला अंमल प्रस्तापित केला. संगमनेरजवळील अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगडावरील लेणी व हरिश्चंद्र मंदिराची निर्मिती चालुक्य काळातच झाली. चालुक्य राजा विक्रमादित्य याच्या इ.स. ७०० च्या एका ताम्रपटात अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन (रशियाना) या स्थलनामाचा उल्लेख आला आहे. या वरून संगमनेर व परिसरातील भूभागावर अकराव्या शतकापर्यंतकल्याणीच्या चालुक्यांची सत्ता होती असे दिसते.

### यादवकालीन संगमनेर

कल्याणीच्या चालुक्यानंतर महाराष्ट्रावर देवगिरीच्या यादवांचे राज्य प्रस्तापित झाले यादव घराणे हे सुरवातीस सेऊणदेशचे यादव म्हणून ओळखले जात होते. सेऊणदेश म्हणजे मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद आणि खानदेशचा भूप्रदेश होय यादव राजवंश हा दृढप्रहार याचा पुत्र सेऊणचंद्र यांच्यापासून सुरु झाला असे मानले जाते या सेऊणचंद्रने सिंदीनगर म्हणजेच सिन्नर भागातील सेऊणपूर येथे आपली राजधानी स्थलांतरित केली यादव राजांचा संगमनेर व परिसरावर अंमल असल्याचे अनेक पुरावे आज उपलब्ध आहेत.

यादव राजा द्वितीय भिल्लम याचा एक ताम्रपट संगमनेर तालुक्यातील वेल्हाळे या गावी मिळाला आहे हा ताम्रपट संस्कृत भाषेत असून तो शके ९२२ म्हणजेच इ.स. १००० मधील आहे. या ताम्रपटात संगमनेरचा उल्लेख ‘संगमनगर’ या नावाने आलेला आहे. या ताम्रपटात संगमनेर तालुक्यातील चिखलीग्राम (चिखली), जम्बलेनिम्बग्राम (जवळे कडलग), वव्वूवेद्र (वेल्हाळे) इ. ग्रामनामाचा व मातुलिढि(म्हाळुंगी नदी) या नदीचा उल्लेख आला आहे. तसेच यादव राजा तृतीय भिल्लम याचा एक ताम्रपट अकोले तालुक्यातील कळस या गावी मिळाला असून हा ताम्रपट शके ९४८ म्हणजेच इ.स. १०२५ या वर्षातील आहे. यामध्ये तृतीय भिल्लमने श्री भट्टाचार्याचा नातू मानमृनायक नावाच्या ब्राम्हणास कळस हे गाव दान दिल्याचा उल्लेख आहे या ताम्रपटात संगमनेरचा उल्लेख ‘संगमिका’ या नावाने आलेला आहे. त्याचप्रमाणे पयोधरा (प्रवरा) नदीचाही उल्लेख आला आहे. तृतीय भिल्लम यांच्या काळातील आणखी एक ताम्रपट राहुरी तालुक्यातील देवळाली येथे मिळाला असून या ताम्रपटात संगमनेर तालुक्यातील‘जुमराहटा’ (जोर्वे) या ग्रामनामाचा उल्लेख आलेला आहे.

इ. स. १०९८ चा चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा मंडलिक असलेल्या यादववंशीय ऐरम्मदेवचा एक ताम्रपट संगमनेर तालुक्यातील आश्वी या गावातील एका शेतात मिळाला. या ताम्रपटात महामंडलेश्वर ऐरम्मदेव याने पाच प्रधानांच्या अनुमतीने सध्याच्या संगमनेर तालुक्यातील कोंकणेग्राम(कोकणगाव) हे गाव कूकल नावाचा पंडित व इतर ३० ब्राम्हणांना दान दिल्याचे नमूद केले आहे. तसेच या ताम्रपटात संगमनेर तालुक्यातील वडगव ग्राम(वडगाव पान), जुंयरवे (जोर्वे), कोंची (कोनची), मानियवली (मनोली), कपथग्राम (कौठे कमळेश्वर), मेशी-पाणीय (मेंढवन) इ. गावांच्या नावाचा उल्लेख आहे. या आश्वी ताम्रपटात संगमनेरचा उल्लेख ‘संगमनेरा’ असा करण्यात आलेला आहे.

दहाव्या व अकराव्या शतकात सेऊण देशातील यादवांच्या राज्यात संगमनेर हे एक महत्वाचे प्रशासकीय केंद्र म्हणून उदयाला आले व संगमनेर परिसरात अनेक गावे निर्माण झाल्याचे यादव राजांच्या ताम्रपटांवरून दिसून येते यादव राजांनी अकोले, सिन्नर व नाशिक परिसरात अनेक किल्ले बांधले. यामध्ये संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील पेमगड किल्याचाही समावेश आहे. याच काळात नागरी वस्त्यांची वाढ झाल्याने संगमनेरला बाजारपेठेचे रूप प्राप्त झाले या बाजारपेठांमध्ये सोने-चांदीच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होत असत. नेवासा आणि संगमनेर ही ठिकाणे शैक्षणिक केंद्र म्हणूनही याच काळात पुढे आली. देवगिरीच्या यादवांनंतर महाराष्ट्रावर अर्थातच संगमनेर भागावरही दिल्ली सुलतानशाहीचा अंमल प्रस्तापित झाला.

### बहामनीकालीन संगमनेर

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या जोखडातून मुक्त होऊन अल्लाउद्दिन हसन गंगूयाने दौलताबाद येथे इ.स. १३४७ मध्ये आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. हे राज्य बहामनी राज्य या नावाने ओळखले जाते. या राज्यात संगमनेरच्या भूप्रदेशाचा समावेश होता. याच काळात पपेरा कोळी ह्यास बहामनी राजांनी उत्तर कोकणातील जव्हार प्रांताचा राजा बनविले. पपेरा कोळी यांच्या नंतर त्याचे वारस जव्हारच्या गादीवर आले. बहामनी राजांचे सार्वभौमत्व मान्य करून हे कोळी राजे अंतर्गत स्वायत्तता उपभोगत होते.या कोळी राज्यात काही काळ अकोले व संगमनेरचा पश्चिमेकडील डोंगराळ भूप्रदेश समाविष्ट होता.

### निजामशाहीकालीन संगमनेर

इ.स. १४९० च्या सुमारास बहामनी राज्याच्या विघटनाची प्रक्रिया सुरु झाली. इ.स. १४९० मध्ये बहामनी राज्यातून फुटून मलिक अहमद याने अहमदनगर येथे निजामशाहीची स्थापना केली. त्यामुळे अहमदनगरबरोबरच संगमनेरचा भूप्रदेश निजामशाहीच्या वर्चस्वाखाली आला. निजामशाहीकाळात मलिक अंबरने मोगल राजपुत्रशहाजहान व त्याच्या कुटुंबाला संगमनेर येथील गढीवजा किल्यात आश्रय दिला होता. मोगल सरदार महाबतखानाने इ.स. १६३३ मध्ये देवगिरीचा किल्ला ताब्यात घेऊन हुसैन निजामशाहा व त्याचा वजीर फत्तेखान यांना कैद केले त्यावेळी शहाजी राजांनी निजामाशाहीचा एक वारस मुर्तुजा यास मुक्त करून त्यास संगमनेर जवळील शाहगडावर राज्यभिषेक करून गादीवर बसविले व निजामशाहीच्या पुनर्स्थापनेचा देखावा निर्माण करून स्वतः राज्यकारभार पाहण्यास सुरवात केली जेधे शकावलीमध्ये या प्रसंगाचे वर्णन ‘भाद्रपद मासी शहाजीराजे याणी पेमगिरीस निजामशाहीवारी छेत्र धरीले’ असे आले आहे. ८ मार्च १६३६ रोजी मोगल सरदार शाहिस्तेखान याने संगमनेर भागावर आक्रमण करून हा प्रदेश जिंकून घेतला यामुळे संगमनेरचा प्रदेश मोगलांच्या ताब्यात गेला.

### मोगलकालीन संगमनेर

मोगल काळात संगमनेरला प्रशासकीयदृष्ट्या महत्व प्राप्त झालेले दिसून येते. याकाळात संगमनेरला ‘सरकार’ या प्रशासकीय घटकाचा म्हणजे आजच्या जिल्ह्याच्या स्वरूपाचा दर्जा देण्यात आला होता. संगमनेरमधील किल्लेवजा गढी ही या प्रशासकीय घटकाचे केंद्र होते. संगमनेर ‘सरकार’ मध्ये त्यावेळी उत्तरेकडे गोदावरी नदी, पश्चिमेकडे सह्याद्री पर्वत व दक्षिणेकडे जुन्नर पर्यंतच्या प्रदेशाचा समावेश होता. या संगमनेर सरकारात अहमदाबाद (येवले), त्र्यंबक, दिंडोरी, धांदरफळ, चांदवड, (जाफराबाद), सिन्नर, नाशिक, (गुलशनाबाद) वणी इ. महालांचा समावेश होता. मोगलकाळात या ‘सरकार’चे एकूण उत्पन्न १८ लाख, १५ हजार, २५१ रुपये, ११ आणे, ३ पैसे इतके होते.[४२]

### शिवकालीन संगमनेर

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेकदा संगमनेर परिसरावर स्वाऱ्या केलेल्या दिसून येतात शाहिस्तेखानच्या पराभवानंतर महाराजांनी जुन्नर, संगमनेर, त्र्यंबक व पट्टा परिसरातील किल्ले स्वराज्यात सामील करून घेतले होते. मात्र हा प्रदेश स्वराज्यात फार काळ टिकु शकला नाही. इ. स. १६७९ मध्ये शिवाजी महाराज जालना स्वारी करून परतत असताना औरंगाबादचा सुभेदार व मोगल शहजादा मुअज्जम औरंगाबादवरून मराठ्यांचा पाठलाग करू लागला त्याचा एक सरदार रणमस्तखान याने संगमनेर जवळ मराठ्यांना गाठले. शिवाजी महराजांचे सरदार संघोजी निंबाळकर यांनी तीन दिवस मोगलांचा प्रतिकार केलामात्र ते धारातीर्थी पडले. सरदार अनंतराव जखमी झाले आणि संताजी घोरपडेही मागे फिरले. यावेळी मराठ्यांचे चार हजार सैनिक मारले गेले इ.स. १६८० साली छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला व त्यांचे पुत्र संभाजी हे छत्रपती बनलेसंभाजी महाराजांनी गादीवर येताच मोगल प्रदेशावर अनेकदा हल्ले केले होते. यामुळे मराठ्यांच्या हल्ल्यापासून आपल्या प्रदेशाचा बचाव करण्यासाठी औरंगजेबाला संगमनेरच्या ठाणेदाराला अनेकदा सूचनाही द्याव्या लागल्या होत्या.

### पेशवेकालीन संगमनेर

औरंजेबाच्यामृत्युनंतरइ. स. १७२० मध्ये संगमनेरचा प्रदेश मराठा राज्याला जोडला गेला छत्रपती शाहूंनी या प्रदेशाच्या देखरेखीची जबाबदारी पेशव्यांकडे सोपविली पेशवेकाळात बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांचा संगमनेर व परिसराशी जवळून संबंध आला त्यांनी या भागात असताना मौजे साकुर-मांडवे व मौजे आश्वी-उंबरी या ठिकाणी अनेकदा मुक्काम केले त्यांच्या कार्यकाळात संगमनेर परगण्यातील चंदनापुरीजवळील डोंगराळ भागाचा फायदा घेऊन हणमंत नाईक याने या परिसरातील भिल्ल लोकांनाएकत्र करून पेशव्यांच्या विरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला हणमंत नाईक या भागात दरोडे व लुटमार करत होता. त्याचा उपद्रव वाढू लागल्याने बाळाजी बाजीराव पेशव्यांनी बंदोबस्त करण्यासाठी आपले सैन्य पाठविले पेशव्यांचे सैन्य व हणमंत नाईक यांची संगमनेरनजीक चंदनापुरीच्या घाटात चकमक उडाली. या चकमकीमध्ये हणमंत नाईक मारला गेला इ.स. १७५३-५४ मध्ये पेशवे व निजाम सलाबतजंग यांच्यात तह झाला. या तहानुसार पेशव्यांनी १२ किल्ले निजामाला देण्याचे ठरविण्यात आले. या किल्यांमध्ये इंद्राई राजदेहर, मार्कडा, कांचना, सोनगड या किल्यांबरोबरच संगमनेरजवळील पेमगडचाही समावेश होता पेशवेकाळात प्रसिद्धीस आलेला विठ्ठल सुंदर परसरामी हा मुळचा संगमनेरचा होता तो सुरवातीला पेशव्यांकडे नोकरीला होता. तो बुद्धिमान, महत्वकांक्षी तसेच लष्करी डावपेचातही निष्णात होता परंतु

एकदा भर दरबारात पेशव्यांनी अपमान केल्याचा राग मनात धरून त्याने पेशव्यांची नोकरी सोडली व निजामाकडे गेला. निजामाने त्याला जवळ करत नोकरीवर ठेवले. तसेच त्याची योग्यता व हुशारी पाहून सुरवातीला नाशिक व नंतर संगमनेर सुभ्याचे प्रमुख नेमलेसंगमनेर येथे वास्तव्यास असताना विठ्ठल सुंदरने स्वतःचा वाडाही बांधला या वाड्यांमध्ये सन१८८५ नंतर पेटीट हायस्कूलचे कामकाज होऊ लागले.

सवाई माधवराव पेशवे यांचा संगमनेर व संगमनेर परिसराशी अनेकदा संबंध आला. कसबे संगमनेर, मौजे वरझडी, मौजे आश्वी, मौजे मांडावे, मौजे लोहारे-कसारे या संगमनेर परिसरातील विविध ठिकाणी ते मुक्कामी असल्याच्या नोंदी आहेत. त्यांच्या काळात मराठेशाहीचा प्रमुख आधारस्तंभ असणाऱ्या महादजी शिंदे यांचा संगमनेर परगण्याशी जवळचा संबंधआला होता. महादजी शिंदे यांची जहागीर संगमनेरनजीक असलेल्या पारनेर व श्रीगोंदा भागात होती. संगमनेर परगण्यातील अंभोरे येथील म्हस्केदेशमुख यांच्याशी महादजी शिंदेंनी वैवाहीक संबंध प्रस्तापित केले त्यांनी इ.स. १७७७ मध्ये म्हस्के देशमुखांची कन्या भावनीबाई हिच्याशी विवाह केला. भवानीबाई ग्वाल्हेरला राहण्यास उत्सुक नव्हत्या. त्यामुळे महादजींनी त्यांना संगमनेरमध्ये मोठा वाडा बांधून दिला भवानीबाई कसबा पेठेतील देवीचे दर्शन जात असत. त्यामुळे भवानीबाई साठी वाड्यापासून कसबा पेठेतील मंदिरापर्यंत एक भुयार मार्गही तयारकेले गेला. प्रवरा नदीच्या काठी भवानी बुवा नावाच्या सद्पुरुषाची समाधी होती महादजी शिंदे यांनी भवानीबाई च्या सांगण्यावरून तेथे मंदिर बांधले या मंदिराला 'भवानीबाईचे मंदिर' या नावाने ओळखले जाते पुढील काळात महादजींनी भवानीबाई ना ग्वाल्हेरला जाण्यासाठी आग्रह धरला. त्यामुळे नाईलाजाने ग्वाल्हेरला जात असतांना रस्त्यात येवले नजीक नगरसूल येथे एका मुक्कामीत्यांनी हिरकणी खावून आत्महत्या केली. नगरसूल येथे भवानीबाई ची समाधी आहे[२]

अहिल्याबाई होळकर यांचाही संबंध संगमनेर भागाशी आला अहिल्याबाईनी आपल्या कारकिर्दीत अनेक लोकोपयोगी कामे केली. त्यांनी त्र्यंबकेश्वर, नंदुरबार, नाशिक, चांदवड, जेजुरी, निफाड, पुणतांबे वैगरे ठिकाणी अनेक घाट, धर्मशाळा व मंदिरे बांधली याचबरोबर त्यांनी संगमनेरमध्येही श्रीरामाचे मंदिर बांधले[५३] या मंदिरातील श्रीरामाची मूर्ती ३३ इंच उंचीची असून सोबत लक्ष्मण व सीता यांच्याही मूर्ती आहेत या सर्व मूर्ती संगमरवरी आहेत

१८ व्या शतकाच्या शेवटच्या काळात संगमनेरमधील अनंत फंदीहे शाहीर व कवी म्हणून प्रसिद्धीस आले. अनंत फंदीचे मूळ आडनाव घोलप होते. परंतु संगमनेरजवळील पोखरी या गावातील मलिक फंदी नावाच्या फकिराशीजास्त लोभ असल्याने लोकांनी त्यांचे घोलप ऐवजी फंदी हे नामकरण केले व पुढे तेच नाव सर्वत्र रूढ झाले अनंत फंदी सुरवातीला तमाशासाठी 'लावण्या' लिहित. तसेच तमाशात कामही करत. अनंत फांदीची रसाळ भाषेतील कवने, प्रेक्षकांना ताल धरायला लावणाऱ्या लावण्या व पोवाडे यामुळेत्यांचा तमाशा त्यावेळी लोकप्रिय होता. मध्यप्रदेशमधील इंदोर, ग्वाल्हेर, गुजरातमधील बडोदा, महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली अशा विविध ठिकाणे त्यांच्या तमाशाचे कार्यक्रम होत असत अध्यात्माचा अभ्यास असल्याने अहिल्याबाई होळकरांच्या आग्रहाखातर अनंत फंदींनीतमाशामध्ये काम करण्याचे सोडले व पुढे ते किर्तनाकडे वळले त्यांनी 'श्रीमाधव' नावाचा ग्रंथही लिहिला. अनंत फंदींनी मराठी काव्यप्रकारात रूढ केलेला 'फटका' हा काव्यप्रकार प्रसिद्ध आहे.

पेशवे काळात संगमनेर जवळील आश्वी येथे घोड्यांची पैदास करण्याचे केंद्र होतेयेथे मादवानी वळू ठेवून चांगल्या घोड्यांची पैदास करण्यात येत होती. पेशव्यांनी या घोड्यांना चारण्याची सोय व्हावी म्हणून आश्वी गावाच्या पूर्व भागात प्रवरा नदीच्या तीरावर कुरणे विकसित केली. सन १७४१-४२ मध्ये बाळाजी बाजीराव या भागात असतांना त्यांनी आश्वी येथे मुक्कामही केले होते. शेवटचा पेशवा म्हणून ओळखले जाणारे दुसरा बाजीराव हे ही आश्वी येथे अनेकदा मुक्कामाला असतइ.स. १७९५ मध्ये दुसरा बाजीराव हे पेशवे बनले त्यांचाही संगमनेरसह येथील परिसराशी जवळून संबंध आलासंगमनेरच्या पूर्वेकडील मौजे आश्वीसह कसबे संगमनेर व कसबेधांदरफळ येथे त्यांचे नेहमी मुक्काम असत त्यांच्या कार्यकाळात संगमनेर भागातील प्रकर्षाने गाजलेली व्यक्ती म्हणजे त्र्यंबकजी डेंगळे ही होय त्र्यंबकजी डेंगळे हे संगमनेरपासून पुर्वेला असलेल्या निमगाव जाळी या गावचे रहवासी होते त्र्यंबकजीनी बाजीरावास पडत्या काळात मोलाची मदत केली.

## समारोप

वरीलप्रमाणे ऐतिहासिक वारसा लाभलेल्या संगमनेर तालुक्याच्या भूभागाला ताम्रपाषाणयुगीन जोर्वे संस्कृतीपासून आधुनिक काळापर्यंत ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते

**संदर्भ :-**


१. गंधे नारायण, प्रवराकाठची संस्कृती, ज्ञानेश प्रिंटर्स, संगमनेर, १९८७.
२. डॉ. पाठक अ. शं.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - प्रवरा खोरे, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१३.
३. महामिने सोमनाथ, कहाणी आटपाट नगराची, महाजन ब्रदर्स,पुणे, २०१२.
४. खेडलेकर संतोष, गोष्ट एका गावाची, प्रकाशक सौ. अं. सु. तांबे, नगराध्यक्ष नगरपरिषद संगमनेर, २०११.
५. कुलकर्णी अ. रा.(संपा.), जेधे शकावली – करीना, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.
६. मेहंदळे ग भा., श्री. राजा शिवछत्रपती, भाग १, डायमंड प्रकाशन, पुणे, १९९९.
७. कुलकर्णी अ. रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास (खंड १), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४.